ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४९

श्रद्धा ओझा

(इ. १०वी १९८१)

दि. २ जानेवारी २०२२

जेव्हा कधी कौटुंबिक किंवा नोकरीत मला अडचणी आल्या, ताण-तणाव निर्माण झाला तेव्हा मी त्या परिस्थितीमधून बाहेर पडण्याचा संपूर्ण प्रयत्न केला. रिस्कस् घेतल्या, कधी घाबरले नाही. लोकांना ते खूप चुकीचं वाटलं. मी नोकऱ्या बदलल्या, घरं बदलली. कदाचित हे निर्णय व्यवहाराला धरून नव्हते. पण, मला त्या-त्या परिस्थितीतून बाहेर पडायचं आहे हे एवढंच मी ठरवलं. माझ्या घरात मी एकटीच कमावणारी होते. माझे कुटुंब म्हणजे माझी आई, माझी मुलगी आणि आता एक पाळलेला कुत्रा !! मी कायम माझ्या निर्णयांची जबाबदारी घेतली.

स्त्री म्हणून काही फार वेगळं discrimination मला जाणवलं नाही. पण मला कुठे वेगळेपण दिसतं ते मी सांगते. आजही ८०% महिला त्याच चक्रात अडकलेल्या आहेत. म्हणजे एखादी खूप शिकलेली महिला आणि कमी शिकलेली महिला यांच्या आवडी-निवडी खूप सारख्याच आहेत. खूप पैशाची नोकरी, याच्यापलीकडे शिक्षण आहे म्हणून तयार झालेली वैचारिक बैठक खूप कमी आहे. घर, सुंदर दिसणं, मूल यांच्यातच त्या असतात. राजकारण, समाजकारण यावर बायका भाष्य करताना फार दिसत नाहीत. हे चित्र थोडं बदलायला हवं असं वाटतं.

**तळमळीने शिकवणाऱ्या शिक्षकांच्या आठवणी**

माझे चौथीपर्यंतचे शिक्षण मॉडर्न प्राथमिक विद्यालयामध्ये झाले. त्या मे महिन्यात, माझ्या आईच्या मैत्रिणीने प्रबोधिनीबद्दल सांगितलं. आणि प्रबोधिनीत आता मुलींसाठीपण शाळा सुरू होणार आहे याबद्दल ! तिचा मुलगा हेमंत जोगळेकर प्रबोधिनीच्या सुरुवातीच्या बॅचेस मधला!! त्यामुळे मी परीक्षा दिली – त्या परीक्षेचा खूप वेगळा अनुभव होता!! उषाताई खिरेंनी माझी परीक्षा घेतली होती!! मला प्रबोधिनीत प्रवेश मिळाला म्हणून मी स्वत:ल खूप भाग्यवान समजते. १९७५ची आमची युवतींची पहिलीच तुकडी. आम्हाला आप्पांचा खूप सहवास मिळाला. त्यांच्यातलं तेज, सामर्थ्य खूप जवळून पाहिलं. वास्तूत कुठेही ते भेटले की आम्हाला तुम्ही कशा आहात, कसं चाललं आहे शिक्षण असं अगदी अगत्याने विचारायचे. सर्व विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी त्यांचा खूप मोठा वैयक्तिक संपर्क होता. शाळेचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे अतिशय बुद्धिमान आणि तळमळ असलेले शिक्षक. नलूताई, नीलाताई, अशोकराव, हेमाताई, विद्याताई, रुक्माताई, मुक्तिताई, पुष्पाताई या सगळ्यांची एक मोठी फळीच होती. तरुण आणि खूप हुशार अशी ही फौज होती. नलूताई इतिहास आणि chemistry दोन्ही विषय तितकेच उत्तम शिकवायच्या.. त्यांचं रुथेरफोर्डस् मॉडेल अजूनही लक्षात आहे!!
Biology च्या वसुधाताई चंद्रात्रेय यांनी पोळ्या करायला शिकवल्या होत्या!!

अभ्यास हा शाळेतल्या अनेक गोष्टींपैकी एक होता. त्या प्रवाहात तो होऊन जायचा, अभ्यासाचा म्हणून वेगळा असा कधी ताण आलेला मला आठवत नाही. शाळेमध्ये वाचनाचा तास, कल्पकतेचा तास, असायचा. खूप मजा यायची. आप्पा आठवड्यातून एक तास घ्यायचे. त्या वेळच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीतल्या कुठल्याही एका मुद्यावर मोकळेपणी चर्चा व्हायची!!! हेमाताई आमच्या प्रिन्सिपॉल... अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटीत शिकवणाऱ्या पुष्पाताई आम्हाला geometry शिकवायला!! सीओईपी सारख्या प्रथितयश इंजीनिअरिंग कॉलेजमधून पदवी घेतलेल्या नीलाताई बेसिक इलेक्ट्रिकल सर्किटस् शिकवायला!!! नलूताई – ज्या खरतर डॉक्टर व्हायला हव्या त्यांनी एसएससी केले. त्या chemistry शिकवणार!! अशोकराव तर इतिहास, कल्पकता आणि वाचनवेग हे सगळंच शिकवायचे It was treasure!!! असे सगळेच शिक्षक!! आप्पांसाठी आलेले !! We all were absolutely privileged to be there!!

शाळेतल्या प्रकल्पांचा कायम उपयोग झाला. अशाच एका प्रकल्पासाठी मी आणि माझी मैत्रीण अश्विनीने ग.दि. माडगूळकर यांची मुलाखत घेतली होती. त्यांची ती शेवटचीच मुलाखत होती. रसमयीचे पदार्थ घरोघरी जाऊन विकणं, त्यातून झालेले विक्रीकौशल्याचे प्रशिक्षण हे अजून लक्षात राहिलेलं आहे.

शाळेत आमची मुंज केली होती.. दीक्षांत समारंभ अजूनही आठवतो!! संपूर्ण कुटुंबात, नातेवाईकांमध्ये त्याची चर्चा झाली होती!!

मी शाळेच्या विचारांनी खूप भारावलेली होते, तिथे सांगितलेली प्रत्येक गोष्ट मी खूप नेटाने करायचे. दहावीपर्यंत मी खूप मनोभावे सगळं केलं. कधी-कधी मैत्रिणींच्यात त्याची चेष्टा ही व्हायची!!



**दीपाताई पिळे**



**आम्ही वर्गमैत्रिणी**



**हेमाताई अंतरकर**

### अभियांत्रिकीचे शिक्षण

मी ११वीत स प महाविद्यालयात गेले. आणि एक वेगळा प्रवास सुरू झाला. तेव्हा ११वीचा आणि १२वीचा अभ्यास थोडा मागे पडला. तेव्हा १२वीला फार चांगले मार्क पडले नाहीत. मी प्रवरानगरला अभियांत्रिकीला इलेक्ट्रॉनिक्स शाखेत प्रवेश घेतला, पण एकाच वर्षात मी परत पुण्यात आले आणि भारती विद्यापीठातून पदवी पूर्ण केली. माझ्या वडिलांना खूप आठवण यायची त्यामुळे खूप खटाटोप करून मी परत पुण्यात आले.



नीलाताई देशमुख

Engineering was not at all a pleasant experience. तेव्हा इंजिनिअरिंग म्हणजे काय तर भीती एवढंच मला आठवतं. आमची खाजगी इंजिनिअरिंग कॉलेजची पहिली बॅच So we were looked down upon!! पण मला आठवतय – इंजिनिअरिंगला Series Parallel circuits शिकताना सातवीत नीलाताईंनी शिकवलेलं आठवलं!! आणि आजही जाणवतं, की प्रबोधिनीतलं शिक्षण हे आशय आणि तंत्रज्ञान वगैरे सर्वच बाबतीत त्या काळाच्या खूप पुढच होतं. कॉलेजमध्ये हा विषय शिकताना पहिली दोन वर्षं मला खूप झगडाव लागलं. पण नंतरची दोन वर्षं मात्र माझं विषयांशी खूप छान पटलं. आणि मला पहिली श्रेणी मिळाली.

### पहिल्या कामाचा अनुभव

मी Advani Orlekone या कंपनीमध्ये कामाला लागले. सुरुवातीला तिथे मी DC drives टेस्टिंग आणि मग designing या विभागांमध्ये होते. तिथे दीड वर्षं मी अगदी रात्रीपर्यंत काम करायचे, मजा यायची, overtime करायचे. तिथे मी shop floor वर काम करायचे. सुरुवातीला मी मुलगी म्हणून मला overtime करायला द्यायचे नाहीत, आणि मी भांडून ते काम घेतलं होतं. माझ्यासाठी ती winning moment होती. पण काही काळाने कामातला तोचतोचपणा जाणवू लागला, म्हणजे तुम्ही एखाद्या यंत्रासारखं तेच काम तितक्याच वाजता रोज करता याचा त्रास व्हायला लागला आणि मी ते काम सोडलं. पण तिथे दोन–तीन मैत्रिणी भेटल्या आणि त्यांच्यामुळे खूप उत्तम इंग्लिश पुस्तक वाचायला लागले आणि इंग्लिश बोलायला लागले, ज्याचा मला आजपर्यंत खूप उपयोग होतो.

### शिक्षण क्षेत्रात प्रवेश

नोकरी गेलेली, हातात कुठलंच काम नाही, जे करत होते ते आवडत नव्हतं, प्रयत्नात यश मिळत नव्हतं, आणि एकूण मला खूप नैराश्य आले होते. तेव्हा भारती विद्यापीठाच्या एका प्राध्यापकांनी, तू शिकवायला ये अशी संधी मला दिली, पण मला ती अजिबात घ्यायची नव्हती. इंजिनिअरिंगमध्ये ज्यांना काहीच जमत नाही ते शिक्षक होतात असंच डोक्यात बसलं होतं, तसेच शिक्षक भेटले होते. त्यामुळे आपण काहीतरी खूप कमी दर्जाचं काम करतो आहोत असं वाटायचं. पण बाबांच्या सांगण्यावरून मी एक प्रयत्न करून बघायचं असं ठरवलं. मी अत्यंत नकारात्मक भावनेने ही नोकरी स्वीकारली. पहिले दीड वर्षं मी कधी कुठल्या वर्गात गेलेच नाही. हे मला जमणार नाही आणि करायचंच नाही असं मला सतत वाटायचं. शेवटी माझ्या नोकरीवर गदा यायला लागल्यावर मी त्या वर्गात पहिलं पाऊल ठेवलं.

माझा पहिला तास हा अगदी जादूची छडी फिरवल्यासारखा झाला. त्या जागेत दुसऱ्या बाजूला उभं राहून इतकं सुंदर काही घडू शकतं याचा कधी विचारच केला नाही. मला माझे सगळे शाळेचे दिवस आठवायला लागले, मुक्ताताई असंच म्हणायच्या, नलूताई हेच सांगायच्या असं सगळं अचानक जुळल्यासारखं वाटलं. त्या सगळ्या मुलांच्या मी प्रेमात पडले. आणि तो आनंद मी आजपर्यंत जपते आहे.



विद्यार्थ्यांबरोबर

या नंतरच्या प्रवासात भेटलेले मित्र–मैत्रिणी, झालेलं वाचन यामुळे माझीपण वैचारिक बैठक बदलत होती. भारावलेपण कमी होत वस्तुनिष्ठता अंगी येत होती. शाळेत अनुभवलेलं काही ब्लॅक ॲन्ड व्हाईटपणे बघण्याचे प्रसंग आता चुकीचे वाटत होते. पण शाळेनी सतत सामाजिक संदर्भांना धरून, संवेदनशील होत जगायला शिकवलं. शाळेमुळे तुम्ही सगळ्या गोष्टींना स्वतःचं असं वळण द्यायला शिकता, नाविन्याने काम करायला शिकता. आणि हे सगळं एकत्रितपणे

शिकवताना त्यात प्रकर्षाने दिसून येत. विषय हे फक्त माध्यम होतं. मी एक व्यक्ती म्हणून, माझे विचार, दृष्टिकोन घेऊन मुलांपर्यंत पोचत होते. हेच आम्ही शाळेत अनुभवलं होतं!!!

मी कॉलेजमध्ये शिकवताना असे विषय घेतले जे मुलं फक्त पाठांतर करूनच पास होतात. जे विषय अतिशय कंटाळवाणे म्हणून ओळखले जायचे. पण आम्ही तो संपूर्ण विषय शिकण्यासाठी वर्गाची प्रयोगशाळाच केली, प्रत्येक component च्या मुळाशी गेलो, प्रत्येक विद्यार्थ्याला तो हाताळायला दिला, आणि तो विषय माझ्यासाठी आणि त्यांच्यासाठी एक खूप सुंदर अनुभव होता. एखादा मुलगा जर काही करण्यासाठी झगडत असेल तर मला ते पटकन कळायचं. समजून घेणं हे मला शाळेमुळे जमलं. कोणताही पूर्वग्रह न ठेवता प्रत्येक विद्यार्थ्याशी जोडलं जाणं हा माझ्या व्यक्तिमत्त्वातला महत्त्वाचा गुण मी आत्मसात केला आणि



**विद्यार्थ्यांबरोबर**

हे सुद्धा कुठेतरी शाळेचाच संस्कार होता. शाळेत अभ्यासाव्यतिरिक्त कितीतरी गोष्टींना वाव होता आणि महत्त्वही.

एका मुलाला माझ्या तासाला खूप झोप यायची. काही शिक्षक मुलांना शिक्षा देतात किंवा रागावतात पण यातलं मी काहीच केलं नाही. मी महिना-दीड महिना रोज ठरवायचे, की आज आपण असं शिकवायचं की हा झोपला कामानये, ते मी स्वतःसाठी आव्हान म्हणून घेतलं होतं. आणि एक दिवस खरोखर तो मुलगा वर्गात झोपला नाही. त्याला विचारलं तेव्हा तो म्हणाला, ''मला रोज वाटायचं की आज मला या ओरडतील पण तुम्ही काही बोलायाचाच नाहीत म्हणून मी तुम्ही काय शिकवताय ते ऐकायचं ठरवलं.''

एकदा एक मुलगा वर्गात लक्ष द्यायचा नाही. चौकशी केल्यावर मला कळलं, की तेव्हा तो एक उत्तम पुस्तक वाचत असायचा. मग आम्ही वर्गात त्या पुस्तकावर चर्चा करायचो. एक मुलगा या algorithms ना कंटाळायचा. त्याची कामं वेळेवर नसायची. पण तो सांस्कृतिक कार्यक्रमात खूप पुढे असायचा. मग त्याने या सगळ्या algorithms ना चाली लावून म्हणून दाखवल्या आणि मला ते खूप आवडलं आणि हे सगळं करताना त्याला algorithms पण चांगली समजली. त्यामुळे वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याशी माझा कनेक्ट वाढत गेला. आम्ही एकत्र विकसत गेलो. या सगळ्या अनुभवावरून शिकवणं सोडायचं हा विचार मनात कधी आलाच नाही. पण शिक्षण क्षेत्र म्हणजे UGC त्याचे affiliation, renewal आणि या सगळ्या गोष्टी यायला लागल्या. त्या सगळ्याची खूप चिडचिड व्हायची. मला नोकरीत स्थिरता मिळत नव्हती. तेव्हा ही नोकरी मी १९९५ मध्ये सोडली.

## प्रचिती आणि सामाजिक क्षेत्रात काम


भारती विद्यापीठात शिकवत असतानाच माझी विवेक कुलकर्णी सरांची भेट झाली आणि मी प्रचितीशी जोडली गेले. परत एकदा शाळेशी जोडले गेले. गांधी वस्तीतले अभ्यासवर्ग, अभ्यासदौरे, पडसऱ्याची शाळा अस खूप काही... अनेक नवीन मित्र-मैत्रिणी भेटले. हे दिवस खूपच मस्त आणि अनुभव समृद्ध करणारे होते.

काही कारणांनी प्रचिती सुटलं.. त्यांनंतर मी कर्वे रोडला महिला अनाथाश्रमात काम करायला सुरुवात केली. तिथल्या लहान मुलांबरोबर मी काम करायचे, त्यांच्याबरोबर वेळ घालवायचे, स्वच्छता करायचे. मला त्या सगळ्या मुलांमध्ये खूप असुरक्षितता दिसायची. त्या काळात मी खूप अवघड मनस्थिती असलेल्या लोकांबरोबर काम केलं. तिथून पुढे मी SOFOSH या संस्थेत काम करायला जायला लागले. या सगळ्या काही वेगळ्या अनुभवांनंतर मी दीड वर्षं एका software company मध्ये काम करायचाही प्रयत्न करून पाहिला, पण मला शिकवण्याची ओढ लागली होती. मला आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिकवायची संधी मिळाली.

## आयुष्यातील महत्त्वाचा निर्णय

त्याचवेळी माझ्या घरी माझ्या लग्नाची बोलणी सुरू झाली. मला लग्न करायचं नव्हतं पण मला मूल दत्तक घ्यायचं होतं. मला घरी त्यासाठी खूप समजवावं लागलं. या निर्णयात कुटुंबातील सगळ्यांनी आणि अनेक मित्र-मैत्रिणींनी मला संपूर्ण साथ दिली आणि ते करता यावं म्हणून, नोकरी पक्की करण्यासाठी मास्टर्स पूर्ण केलं!!! आणि २००२ साली मी एक मुलगी दत्तक घेतली.

आता मला काय करायचं आहे याची स्पष्टता होती आणि व्यावसायिक स्थिरता पण मिळाली होती. तेव्हा मी पीएचडी पूर्ण केलं ते नोकरीची गरज म्हणूनाच!! याची प्रेरणाही माझी लेकच होती !! Professionally I was always a rebel. I was



**शिवानी आणि मी**



not compliant to the systems. त्यामुळे मला खूप प्रश्न अजूनही येतात. त्यातल्या-त्यात सगळ्यात जास्त स्वातंत्र्य शिकवताना मिळते असं मला वाटलं. हे करण्यासाठी मला दोन प्रेरणा होत्या, एक म्हणजे माझे विद्यार्थी आणि दुसरं म्हणजे माझी लेक.

My daughter is very complimentary to me. मी जे नाही ते ती आहे. ती सगळं व्यवहारांनी, प्लॅनिंग करून करते. मी अजिबात नाही!! तिच्याबरोबर मी खूप वेगळ्या गोष्टी शिकले. तिच्यासाठी मी पोहायला शिकले, गाडी चालवायला शिकले. ती मला या सगळ्यात खूप साथ द्यायची. माझ्या आयुष्याला तिच्यामुळे एक दिशा मिळाली. माझ्या आयुष्याला ध्येय मिळाले. Journey of parenting was on a very challenging as well as very evolving!! मला दत्तकत्वाचा कधी प्रश्न फारसा भिडलाच नाही. The moment I decided to adopt, I beleived someone has her journey towards me!! I always believed that me and shiinu were meant to be together. It was just that since I was not married she had to take a different, more difficult path to reach me!! आमच्या घरी तिला संपूर्ण acceptance होता. ती स्वतःचं आयुष्य घेऊन आली होती. मला पालकत्वात कधीही जर शंका आली तर मी कायम प्रश्न विचारले - never hesitated to reach out for solutions आणि मला उत्तरं मिळत गेली. आपण जो चश्मा समाजाला दाखवतो त्याच चष्म्यातून जग आपल्याकडे बघतं यावर माझा ठाम विश्वास आहे. तिच्या शाळेच्या प्रवेशाबद्दल पहिल्यांदा अडचण आली होती, ही एकच गोष्ट सोडली तर दत्तक पालकत्व ही माझ्यासाठी कधीच अवघड गोष्ट नव्हती. ती लहान असताना तिला विचारायचे की तुला कुठून आणलं? पण we dealt with it - with a story.

Parenting journey is a very meditative one and it makes you evolve differently as a person. Today shivani is pursuing her own passions - She wants to be a chef!! She is doing culinary arts in Symbiosis!! या सगळ्या प्रवासात माझ्या आईनी खूप खंबीर साथ दिली. कुटुंबातील इतर आणि काही मित्र-मैत्रिणी - जे सतत माझ्या बरोबर होते -- आहेत!!



**Parenting journey**



**आयुष्याला स्थैर्य**




मी २०१४ पासून आर्मी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेत, Electronics and Telecommunication या department मध्ये Associate Professor आहे. मी इथे Computer Science संबंधित विषय शिकवते. आमच्या संस्थेचे संचालक - ब्रिगे. अभय भट हे ही प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांच्यामुळे मी शाळेच्या SPG गटाची सदस्य झाले. परत एकदा प्रबोधिनीशी जोडले गेले. त्यामुळे खूप छान वाटते.

मी कॉलेजच्या Entrepreneurship सेलशी जोडलेली आहे. या भूमिकेतून काम करताना तरुण मुलांना अतिशय झोकून देऊन स्वतःचे प्रॉडक्ट, कंपनी निर्माण करताना बघायला खूपच मजा येत आहे.

आता मी वैयक्तिक आणि व्यावसायिक दृष्ट्या एका स्थिर टप्प्यावर आले आहे असा वाटतं. -स्त्री म्हणून काही फार वेगळं discrimination मला जाणवलं नाही. पण मला कुठे वेगळेपण दिसतं ते मी सांगते. आजही ८०% महिला त्याच चक्रात अडकलेल्या आहेत. म्हणजे एखादी खूप शिकलेली महिला आणि कमी शिकलेली महिला यांच्या आवडी-निवडी खूप सारख्याच आहेत. खूप पैशाची नोकरी, याच्यापलीकडे शिक्षण आहे म्हणून तयार झालेली वैचारिक बैठक खूप कमी आहे. घर, सुंदर दिसणं, मूल यांच्यातच त्या असतात. राजकारण, समाजकारण यावर बायका भाष्य करताना फार दिसत नाहीत हे चित्र थोडं बदलायला हवं असं वाटतं.

जेव्हा कधी कौटुंबिक, किंवा नोकरीत अडचणी आल्या, ताण-तणाव निर्माण झाला तेव्हा मी त्या परिस्थिती मधून बाहेर पडण्याचा संपूर्ण प्रयत्न केला. रिस्कस् घेतल्या. कधी घाबरले नाही. लोकांना ते खूप चुकीचं वाटलं. मी नोकऱ्या बदलल्या, घरं बदलली. कदाचित हे निर्णय व्यवहाराला धरून नव्हते. पण, मला त्या-त्या परिस्थितीतून बाहेर पडायचं आहे हे एवढंच मी ठरवलं. माझ्या घरात मी एकटीच कामावणारी होते. माझे कुटुंब म्हणजे माझी आई, माझी मुलगी आणि आता एक पाळलेला कुत्रा !! मी कायम माझ्या निर्णयांची जबाबदारी घेतली. जेव्हा-जेव्हा अवघड परिस्थिती निर्माण होते तेव्हा सर्वात आधी माझ्या विद्यार्थ्यांचा विचार करते आणि मला त्यातून प्रेरणा मिळते. They are my strength. My work is my strength.

माझ्या आयुष्यात शाळेच्या संस्कारांचा खूप मोठा वाटा आहे. शाळेच्या काही वैचारिक गोष्टी पुढे आयुष्यात चुकीच्या वाटल्या. पण शाळेमुळेच डोळसपणे, संवेदनक्षमपणे आयुष्य जगायला शिकले. शाळेने समृद्धपणे जगायला शिकवलं असं म्हणलं तर चूक ठरणार नाही.



**शिवानी, आई आणि मी**



## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- इजाजत

२. आवडतं पुस्तक- शोध- अरुण साधू

३. छंद - चित्रपट पाहणे

४. पहिली प्रतिक्रिया

- लक्षात राहिलेला शिक्षक - नलूताई
- लक्षात राहिलेला उपक्रम- ग. दि. माडगूळकर यांची मुलाखत


**श्रद्धा ओझा**
**9881204415**
**shrdoza@gmail.com**



**मुलाखत व शब्दांकन - चिन्मयी खरे** **संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org